**( सभापती स्थानी : माननीय सभापती )**

अधिवेशनाचा शुभारंभ "वंदेमातरम्" या गीताच्या गायनाने झाला

-----

( सन्माननीय सदस्य श्री.जितेन्द्र आव्हाड यांनी सीमा प्रश्नाबाबत घोषणा दिली )

**पृ.शी./मु.शी : मंत्र्यांचा परिचय**

श्री.आर.आर.पाटील (उप मुख्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, श्री. नारायण तातू राणे यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्या मार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

05-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) A 2
VTG/ SBT/ MHM/ 13:00

**पृ.शी : शोक प्रस्ताव**

**मु.शी : मुंबईसह राज्यभर झालेल्या अभूतपूर्व अतिवृष्टीमध्ये, " बॉम्बे हाय " येथे लागलेल्या भीषण आगीमध्ये, जम्मू - काश्मीर येथे झालेल्या भूकंपामध्ये मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव**

**सभापती** : आज सदनामध्ये पहिल्याच दिवशी पावसाळी अधिवेशना नंतर आतापर्यन्त राज्यामध्ये ज्या काही नैसर्गिक आपत्ती घडल्या. विशेषत: 26 जुलै 2005 रोजी आणि त्या नंतर मुंबई आणि राज्यभरात अभूतपूर्व अतिवृष्टीमुळे मुंबईसह संपूर्ण राज्यात जीवित व वित्त हानी मोठया प्रमाणावर झाली. ही एक राष्ट्रीय आपत्ती होती की ज्या आपत्तीला राज्यातील सर्वसामान्य जनतेने फार मोठया प्रमाणात प्रयत्नांची पराकाष्ठा करुन तोंड दिले.या अतिभीषण महापुराचे परिणाम कोणाचेही मन हेलावून सोडणारे आहेत. परंतु निसर्ग कोपला तरी माणुसकीचा गहिवर आटला नाही हेही या प्रसंगाने पुन्हा एकदा दिसून आले आहे.महाराष्ट्रातील, देशातील आणि जगातील अन्य देशातीलही असंख्य लोक, स्वयंसेवी संस्था, उद्योगपती, कर्मचारी या सर्वानी या नैसर्गिक आपत्तीमध्ये महाराष्ट्रातील जनतेला जी शक्य आहे ती मदत करण्याचा प्रयत्न केलेला आहे.या प्रसंगामध्ये सामान्य माणसाला उभे करण्याच्या दृष्टीने मानवी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागली.

त्या नंतर दिनांक 27 जुलै 2005 रोजी मुंबई येथील " बॉम्बे हाय "येथे लागलेल्या भीषण आगीच्या दुर्घटनेत त्या ठिकाणचे काही कर्मचारी आपले कर्तव्य बजावतांना मृत्यूमुखी पडले आहेत त्याच प्रमाणे दिनांक 8 ऑक्टोबर 2005 रोजी जम्मू - काश्मीर येथे झालेल्या भूकंपाच्या धक्क्यामध्ये हजारो निष्पाप नागरिक मृत्यूमुखी पडले. या घटना अतिशय दु:खद आहेत.या दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना आधार देणे त्याच बरोबर त्यांचे पुनर्वसन होत असतांना शक्य आहे ती मदत करणे या दृष्टीने राज्य सरकारचेसुध्दा प्रयत्न सुरु आहेत. या उत्कट भावनेच्या पार्श्वभूमीवर मी आपल्या सभागृहाच्या वतीने या आपत्तीमधील मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या दु:खद निधनाबद्दल पुढील शोक प्रस्ताव प्रस्तुत करीत आहे .

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

"दिनांक 26 जुलै 2005 रोजी व त्यानंतरही मुंबईसह राज्यभर झालेल्या अभूतपूर्व अतिवृष्टीमुळे उद्‌भवलेल्या पूरस्थितीत तसेच दिनांक 27 जुलै 2005 रोजी 'बॉम्बे हाय' येथे लागलेल्या भीषण आगीत व दिनांक 8 ऑक्टोबर 2005 रोजी जम्मू-काश्मीर येथे झालेल्या भूकंपामध्ये मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करीत आहे."

सन्माननीय सदस्यांनी स्तब्ध उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

( सदस्य उभे राहतात. )

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे.

***

....... बी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : **शोक प्रस्ताव**.

**मु.शी.** : श्री. के.आर.नारायणन्, माजी राष्ट्रपती., सर्वश्री रतनलाल मोहनलाल, राम आसुदोमल तोलानी व प्रा.मधु रामचंद्र दंडवते, माजी विधान परिषद सदस्य यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव.

----

श्री. आर.आर. पाटील (उपमुख्य मंत्री) : महोदय, श्री. के.आर.नारायणन्, माजी राष्ट्रपती., सर्वश्री रतनलाल मोहनलाल, राम आसुदोमल तोलानी व प्रा. मधु रामचंद्र दंडवते, माजी विधान परिषद सदस्य, यांच्या दु:खद निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो -

( **प्रेस** : कृपया सोबतचा मजकूर येथे छापावा.)

..... बी 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

माननीय सभापती महोदय, कै. के.आर.नारायणन् यांचा जन्म 27 ऑक्टोबर 1920 रोजी केरळ मधील कोट्टायम जिल्ह्यात उझावूर येथे झाला. अत्यंत गरीब कुटुंबामध्ये जन्म झाला असताना आणि मागासवर्गीय पार्श्वभूमी असताना देखील 20 कि.मी. पर्यंत चालत शाळेत जाऊन त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले आणि नंतर उच्च विद्याविभूषित होऊन देशातील सर्वोच्च पदापर्यंत पोहोचण्याचे कर्तृत्त्व त्यांनी करून दाखविले आहे. लहानपणी ज्यांना शाळेमध्ये प्रवेशदेखील मिळाला नव्हता. पण नंतर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण, उच्च शिक्षण घेऊन पुढे देशातील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे प्रमुखपद त्यांनी भूषविले. केवळ देशातीलच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पदव्या संपादन करून स्वतंत्र भारतामध्ये एक दलित व्यक्तीसुद्धा सर्वोच्च स्थानापर्यंत पोहोचते हा देशाच्या लोकशाहीचा बहुमान त्यांच्या माध्यमातून घडला आहे. प्रसिद्धीपासून अतिशय दूर राहून देश पुढे देण्यासाठी त्यांनी खूप मोठे योगदान दिले होते. अशा एका अत्यंत अभ्यासू नेत्याला हा देश मुकला आहे. मी या सभागृहाच्या वतीने आणि राज्यातील 10 कोटी जनतेच्या वतीने त्यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, कै. रतनलाल मोहनलाल यांचा जन्म 16 मार्च 1919 रोजी झाला. त्यांचे शिक्षण एम.ए. पर्यंत झाले होते. कै. रतनलाल मोहनलाल 1957 ते 1960 आणि 1960 ते 1966 असे दोन वेळा महाराष्ट्र विधान परिषदेचे नामनियुक्त सदस्य होते. या कालावधीत अत्यंत चांगल्या पद्धतीने लोकप्रतिनिधीत्व त्यांनी केले आहे. त्यांच्या निधनामुळे महाराष्ट्र एका चांगल्या सामाजिक कार्यकर्त्याला मुकला आहे.

सभापती महोदय, कै. राम आसुदोमल तोलानी यांचा जन्म 5 जुलै 1938 रोजी पाकिस्तान मधील कराची येथे झाला. 1990 ते 1996 या कालावधीत या सदनामध्ये त्यांनी राज्यपालांद्वारे नामनियुक्त सदस्यत्व भूषविले होते. आंबेडकर मिशनचे कार्यकर्ते म्हणून त्यांनी केलेले कार्य भूषणावह असेच आहे. अशा एका सामाजिक कार्यकर्त्याला महाराष्ट्र आज मुकला आहे.

सभापती महोदय, कै. प्रा.मधू रामचंद्र दंडवते यांचा जन्म 21 जानेवारी 1924 रोजी अहमदनगर येथे झाला आणि त्यांचे शिक्षण एम.एस्सी.पर्यंत झाले होते. एक समाजवादी नेता म्हणून लोकसभेमध्ये आणि या सदनामध्ये देखील काम केलेले आहे आणि त्यांचा आदर्श प्रत्येक राजकीय कार्यकर्त्याने आपल्या नजरेसमोर ठेवावा असे लोकप्रतिनिधीत्व त्यांनी केलेले आहे. अत्यंत साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हे त्यांचे प्रमुख वैशिष्ट्य होते. ( यानंतर ... सी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

या देशाचे रेल्वेमंत्री पद भूषवित असतांना कोकण रेल्वे प्रकल्पाला त्यांनी दिलेले प्राधान्य, दिलेले योगदान याचा महाराष्ट्राला कधीही विसर पडू शकत नाही. राजकारणातील एक चांगूलपणा त्यांच्या जाण्याने लोप पावला. महाराष्ट्र त्यांचा ऋणी आहे. माजी राष्ट्रपती श्री. के.आर. नारायणन व या सदनाचे माजी सदस्य यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते माननीय श्री. आर. आर. पाटील यांनी या ठिकाणी जो शोकप्रस्ताव आणला आहे त्याला अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे. या देशाचे माजी राष्ट्रपती स्वर्गीय के. आर. नारायणन , व या सभागृहाचे सदस्य सर्वश्री रतनलाल मोहनलाल, राम आसुदोमल तोलानी व प्रा. मधु रामचंद्र दंडवते यांच्या दु:खद निधनानिमित्त हा प्रस्ताव आहे. या देशातील दलितांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि उध्दारासाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचणारे कै. के.आर. नारायणन हे या देशाचे पहिले दलित राष्ट्रपती होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा या शिकवणुकीप्रमाणे ते आपले आयुष्य जगले. त्यामुळे भारताचे 10 वे राष्ट्रपती म्हणून त्यांची कारकीर्द गाजली. केरळमध्ये कोट्टायम जिल्हयातील उझावूर येथे एका गरीब कुटुंबामध्ये त्यांचा जन्म झाला. एका गरीब दलिताच्या घरी जन्मलेल्या या महामानवाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रमाणे सुरुवातीपासून शिक्षणावर खूप प्रेम होते. आणि या प्रेमातून कष्ट करुन त्यांनी सर्व प्रकारची स्कॉलरशीप मिळविली. ते त्रावणकोर विद्यापीठातून इंग्रजी विषय घेऊन एम.ए. पदवी परीक्षा प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले. सभागृहाच्या नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे प्राथमिक शिक्षण घेण्यासाठी ते घरापासून 15 ते 20 कि.मी. पायी चालत जावून त्यांनी प्राथमिक शिक्षण पूर्ण केले.त्यांनी त्या शिक्षणाचा आपल्या आयुष्यामध्ये पुरेपूर उपयोग केला. व पुढील आयुष्यामध्ये एक शिक्षण तज्ञ ा,प्रशासक, पत्रकार, राजनितीज्ञ, घटनातज्ञ म्हणून त्यांनी आपला नावलौकिक मिळविला. काही काळ परदेशात साप्ताहिक व वृत्तपत्रांचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी काम पाहिले. भारतात आल्यानंतर त्यांनी परराष्ट्र सेवेत प्रवेश केला. अमेरिकेमध्ये भारताचे राजदूत म्हणून 4 वर्षे काम पाहिले. . त्यानंतर 1984, 1989 व 1999 मध्ये तीन लोकसभेच्या निवडणुका केरळ मधील ओट्टालम या मतदारसंघातून लढवून त्यांनी विजयाची हॅटट्रीक साधली. केंद्रामध्ये त्यांनी विविध खात्यांचा मंत्री म्हणून समर्थपणे कायभार संभाळला. ते सन 1992 मध्ये या देशाचे उपराष्ट्रपती झाले. आणि दिनांक 25 जुलै 1997 मध्ये त्यांची देशाचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवड झाली. साधारणपणे ही निवड होत असतांना सर्व राजकीय पक्षांनी त्यांना पाठींबा दिला व एकमताने त्यांची निवड केली. असे एकमेव दहावे राष्ट्रपती म्हणून त्यांनी या देशाचे काम पाहिले. कै. के.आर. नारायणन यांना मानाचे अनेक पुरस्कार मिळाले. अमेरिकेने त्यांना "वर्ल्ड स्टेट्समन ऑफ द

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

इअर" हा सन्मान मिळविणारे ते आशियातील प्रथम नागरिक होते. त्यांना वाराणसीच्या संपूर्णानंद संस्कृत विद्यापीठाने दिलेली "वाचस्पती" ही पदवी देखील अतिशय मानाची होती.

अशाप्रकारची दैदीप्यमान कारकीर्द असलेल्या कै. के.आर. नारायणन यांचे दिनांक 9 नोव्हेंबर 2005 रोजी निधन झाले. त्यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो.

त्यानंतर कै. राम तोलानी यांच्या दु:खद निधनानिमित्त माननीय श्री. आर.आर. पाटील यांनी शोकप्रस्ताव मांडला. कै. राम तोलानी हे 1996 पर्यंत या सभागृहाचे सदस्य होते. त्यांचा व माझा व्यक्तिगत परिचय होता. समाजासाठी सतत धडपडणारा नेता म्हणून त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/SBT/MHM/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 13:15

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

सभापती महोदय, स्व.प्रा.मधु दंडवते यांचेही या देशाच्या उभारणीमध्ये फार मोठे योगदान आहे. प्रा.दंडवते यांच्या निधनामुळे कोकणचा सुपूत्र नव्हेतर देशाचा सुपूत्र आपल्यातून निघून गेला आहे. प्रा.दंडवते यांची सर्वात महत्वाची कोणती ओळख असेल तर ती म्हणजे "कोकण रेल्वेचे शिल्पकार" म्हणून. कोकणात "रेल्वे" हे कोकणवासियांचे स्वप्न केवळ मधु दंडवते यांच्या अथक परिश्रमामुळेच साध्य झाले असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. व्यक्तिगत स्वार्था साठी पक्ष, विचार, तत्व यांना तिलांजली देऊन तडजोडी करणाऱ्यांची आज चलती असताना अखेरच्या श्वासापर्यंत तत्वासाठी, जीवनभर जपलेल्या जीवन मुल्यांसाठी कोणत्याही प्रकारची तडजोड न स्विकारणारा राजकीय क्षितीजावरील दीपस्तंभ म्हणून प्रा.मधु दंडवते चिरंतन स्मरणात राहतील. निष्कलंक चारित्र्य, सचोटी, प्रामाणिकपणा, अभ्यासूवृत्ती, चिकाटी इत्यादी असंख्य गुणांमुळे कोकणातील राजापूर मतदार संघाचे सलग वीस वर्षे त्यांनी प्रतिनिधीत्व केले. सन 1995 ते 1989 या काळात लोकसभेत अनभिषिक्त विरोधी पक्षनेते म्हणून ते वावरले. संसदीय प्रथा परंपरांचे ते प्रकांड पंडित होते. रेल्वेमंत्री म्हणून त्यांची कारकीर्द खूपच गाजली. मोरारजीभाई देसाईंच्या कार्यकाळात ते रेल्वेमंत्री झाले. विशेष म्हणजे "तुम्हाला रेल्वे खाते सांभाळावयाचे आहे" असा जेव्हा मोरारजीभाई देसाई यांचा त्यांना फोन आला, तेव्हा ते आपल्या घरी स्वत:चे कपडे स्वत:च धूत होते. यावरुन आपल्याला कल्पना येईल की, कितीही विद्वान असले तरी त्यांची राहणी सामान्य स्वरुपाची होती. अशा सामान्य वाटणाऱ्या भारतमातेच्या असामान्य सुपूत्राचे दिनांक 12 नोव्हेंबर 2005 रोजी निधन झाले. मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो. याठिकाणी सभागृहाच्या नेत्यांनी सर्वश्री. रतनलाल मोहनलाल, राम आसुदोमल तोलानी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत, त्या सर्व व्यक्तींना मी श्रध्दांजली अर्पण करतो.

----

. . . .डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

स्व.के.आर.नारायणन हे या देशाचे भूतपूर्व राष्ट्राध्यक्ष होते आणि त्यांचे दि.9 नोव्हेंबर 2005 रोजी निधन झाले. माझा योग असा की, मी जेव्हा लोकसभेत गेलो, तेव्हा राष्ट्रपती पदासाठी मतदान करण्याचा प्रसंग आला नाही. पण सर्वांनीच एकमताने राष्ट्रपती म्हणून स्व. के.आर.नारायणन यांची निवड केली आणि हीच गोष्ट गौरवास्पद आहे की, आमच्या या देशाच्या सर्वोच्च स्थानी देखील एक दलित मनुष्य जाऊन बसू शकतो हे लोकशाहीचे वैशिष्टय आहे आणि ते त्यांच्या निवडीने सर्व देशासमोर सिध्द झाले. ते अतिशय मृदूभाषी होते. त्यांचा कोणत्याही विषयाबाबत गाढा अभ्यास होता. राष्ट्रपती म्हणून लोकसभेमध्ये मला त्यांची भाषणे ऐकण्याची संधी प्राप्त झाली. अतिशय मृदू व्यक्तीमत्व, सर्वसमावेशक असे सर्व विषयांचे सखोल ज्ञान असल्याचे त्यांच्या चेहेऱ्यावर दिसत होते. पण त्यांची वर्तणूक अतिशय सौजन्यपूर्ण होती. ते राष्ट्रपती पदावरुन उतरल्यानंतर खरे म्हणजे त्यांना प्रदीर्घ आयुष्य लाभावयास हवे होते. पण तसे ते त्यांना लाभले नाही, तर अल्पावधीत त्यांचा स्वर्गवास झाला ही अतिशय दु:खाची गोष्ट आहे. असे व्यक्तीमत्व निर्माण होते आणि अंतर्धान पावते.मग असे व्यक्तीमत्व पुन्हा कधी निर्माण होईल असे प्रश्नचिन्ह निर्माण होते. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, कै.रतनलाल मोहनलाल हे या सदनाचे दोन वेळा सन्माननीय सदस्य होते. माझा त्यांच्याशी परिचय नव्हता. ते या सदनाचे माजी सन्माननीय सदस्य होते, या सभागृहाच्या नेत्यांनी त्यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे आणि ज्या भावना व्यक्त केल्या आहेत, त्याच्याशी मी सहमत आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरु....

यानंतर श्री.राम तोलानी यांचा माझा व्यक्तिगत परिचय होता. अतिशय कार्यतत्पर, अनेक विषयांचा चांगला अभ्यास असलेले, प्रत्येक गोष्टींची काळजी करणारे, ते कोठेही असले तर तेथून फोन करुन संपर्क साधणारे, नेहमीच महाराष्ट्रासमोर प्रश्न असतात, त्याची काळजी वाहणारे असे त्यांचे व्यक्तीमत्व होते, याची सदनामध्ये त्यांच्याबरोबर जे सन्माननीय सदस्य होते, त्यांना याची कल्पना असेल. ते आपल्यातून निघून गेले, हे मला आज शोकप्रस्तावाद्वारे समजले. ते गेल्याची मला माहिती नव्हती, असे काही वेळेळा आयुष्यामध्ये घडते.

त्यानंतर प्रा.मधु दंडवते यांच्याबद्दल बोलायचे तर त्यांचा माझा अनेक वर्षापासून परिचय होता. 1968 साली मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये ते आमच्या बरोबर होते. अनेक ठिकाणी त्यांनी भाषणे केली, त्यावेळेला व्यासपीठावर विविध प्रकारच्या प्रचार सभेमध्ये भाग घेण्याची मला संधी प्राप्त झाली. आमच्या कोकणच्या लोकसभा मतदार संघामध्ये ते एक वेळा नाही, तर पाच वेळा निवडून आले. 20 वर्षे ते लोकसभेचे सदस्य होते. अत्यंत साधी रहाणी, उच्च विचारसरणी असणारे...सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील याबाबत बोलले, त्यांच्याशी मी सहमत आहे. कारण त्यांचे जीवन अत्यंत जवळून पहाण्याची संधी मला प्राप्त झालेली आहे. ते अतिशय विद्वान होते. मध्यंतरी भोपाळ येथे एका संस्थेचे एक ओरिएन्टेशन क्लासेस होते. त्या ठिकाणी मीही एक लेक्चरर म्हणून गेलेलो होतो, तसे तेही लेक्चरर म्हणून आलेले होते. त्यांचा विषय हा अर्थशास्त्रावर होता. त्यांच्यासमोर बजेट कसे मांडावे हा विषय होता. त्यावेळेला जवळून माझी त्यांची भेट झाली. त्यावेळी मी त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली. त्यावेळी माझ्या लक्षात आले की, यांना जो आजार आहे, त्यामधून ते बरे होतील की नाही याबद्दल एक प्रकारची मनामध्ये शंका होती. पंरतु त्यांच्या चेहऱ्यावर तेज होते. शेवटी मृत्यूने त्यांच्यावर घाला घातला. अशाप्रकारचे साधे, मनमिळावू, हुशार, अभ्यासू व्यक्तीमत्व अंतर्धान पावलेले आहे,त्याबद्दल अतिशय दु:ख होते. अशाप्रकारे चार दिवंगत व्यक्तींना श्रध्दांजली वाहण्यासाठी जो शोकप्रस्ताव मांडला गेलेला आहे, त्याच्याशी आमचा पक्ष सहमत आहे, आम्ही त्यांना विनम्र श्रध्दांजली वाहतो.

--

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभागृहाचे नेते आणि मा.उपमुख्यमंत्री यांनी या ठिकाणी जो शोकप्रस्ताव मांडलेला आहे, त्याच्याशी सहभावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. भारताचे माजी राष्ट्रपती के.आर.नारायणन् यांच्या दु:खद निधनाने एक थोर नेता आपल्यातून निघून गेलेला आहे. एकेका दिशेने राजकीय कर्तृत्व संपन्न करणारी अनेक माणसे आपल्याला मिळतील. पण विविध प्रकारच्या कर्तृत्ववान अशा व्यक्तीमत्वामध्ये शिरुन त्या त्या ठिकाणी कर्तृत्व बजावणारे विविधांगी अशाप्रकारचे व्यक्तीमत्व हे श्री.नारायणन यांच्या निधनामुळे निघून गेलेले आहे. ग्रामर ऑफ पॉलीटिक्सचे लेखक, हेरॉल्ड लासकी हे त्यावेळेला लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे डायरेक्टर होते. लंडन इकॉनॉमिक्सचा त्यावेळेला जो स्तर होता, त्या लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये धडे घेण्याची संधी त्यांना मिळाली. त्यांनी अत्यंत गरीब परिस्थितीमध्ये असून देखील भारतातील वृत्तपत्रांची पत्रकारिता करुन त्यांनी आपले त्या काळामध्ये आपले शिक्षण पूर्ण केले. इंडियन फॉरेन सर्व्हीसमध्ये एक प्रदीर्घ अशाप्रकारचे करियर त्यांनी केले. निरनिराळया देशातील दुतावासामध्ये ब्रम्हदेशामध्ये, जपानमध्ये, लंडनमध्ये, ऑट्रेलियामध्ये तेथील दुतावासामध्ये त्यांनी अनेक वर्षे काम केले. थायलंड, तुर्कस्थान,तसेच अमेरिकेमध्ये तर राजदूत म्हणून प्रदीर्घ अशाप्रकारची कारकीर्द त्यांनी केली. त्यांची आय.एम.एफ.ची एका बाजूला कारकीर्द,त्यानंतर एक नव्हे, दोन नव्हे तीन कार्यकाळ ते या देशाच्या लोकसभेमध्ये "सदस्य"म्हणून ते राहिले निरनिराळया पदावर त्यांना काम करण्याची संधी मिळाली, त्या प्रत्येक संधीचे त्यांनी सोने केलेले आपल्याला दिसून येईल. अतिशय चांगला दर्जा ठेवून त्या पदाला न्याय त्यांनी दिल्याचे आपल्याला दिसून येईल. श्री.नारायणन् यांच्या दु:खद निधनाने मुळातील हाडाचा पत्रकार, जाणता शिक्षण तज्ज्ञ, मितभाषी, शांत पण चारित्र्यसंपन्न असा थोर अनुभवी प्रशासक, एक मुत्सद्दी उच्च दर्जाचा राज विधिज्ञ व राजकारणी आपल्यातून निघून गेलेला आहे. परिश्रम आणि विद्वत्ता यांच्या आधारावर राजकीय जीवनाचा प्रवास कसा करावा, याचे मूर्तीमंत उदाहरण डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी या दोघांच्याही विचाराचा समन्वय साधून, तो कृतीत उतरविण्यासाठी शेवटपर्यन्त धडपड करणारे आदर्श व्यक्तीमत्व आपल्यातून निघून गेलेले आहे.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख......

कै. प्रा. मधु दंडवते यांच्या निमित्ताने संसदीय चारित्र्याचा मूर्तिमंत जीवंत आदर्शच आपल्यासमोरुन निघून गेलेला आहे. फार कमी माणसे आपल्याला अशी मिळतात की, ज्यांच्याविषयी मनापासून मोकळेपणाने आपल्याला दाद देता येते. राजकीय जीवनात कोणत्या त-हेने आपण जीवन जगले पाहिजे याच्या बाबतीत अनेक सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. संसदेतील त्यांच्या विनोदबुध्दीवर स्वतंत्र पुस्तक लिहिता येईल इतका त्या कामाचा पाठपुरावा आपल्याला करता येऊ शकेल. दर्जाच्याबाबतीत तडजोड न करतांना विनोद कसा करावा, कोणाचेही मन न दुखावता संसदीय कामामध्ये विनोदाचा उपयोग कसा करावा हे पहावयाचे असेल तर प्रा. मधु दंडवते यांचे उदाहरण हे अतिशय उत्तम असे उदाहरण आहे. त्यांचे हे विनोदाचे अंग अनेकांना माहिती आहे. पण अत्यंत गंभीर विषयावर सुध्दा ते ज्या त-हेने विचार मांडीत असत त्यामध्ये सुध्दा देशाच्या स्तरावर आदर्श म्हणून त्यांचे विचार असत. विशेषतः श्रीमती इंदिरा गांधी यांच्या दुःखद निधनानंतर त्यांनी जे भाषण केले त्या भाषणातील उल्लेख हा राष्ट्रीय स्तरावरील महत्वाचा उल्लेख मानला जातो. या देशाला दुसरा पंतप्रधान मिळेल, तुमच्या पक्षाला दुसरा अध्यक्ष मिळेल पण राजीव गांधीनी आपली आई गमावली आहे ती त्यांना मिळणार नाही, असा उल्लेख त्यांनी केला होता. अध्यक्ष महाराज, दुःखद विचारामध्ये सुध्दा त्यांनी अतिशय महत्वपूर्ण विचार मांडलेले आहेत. याचे सगळयात महत्वाचे कारण कोणते असेल तर ते हे की, प्रा. मधू दंडवते यांनी त्यांचे राजकीय चारित्र्य अतिशय उत्तमरीतीने जपलेले होते. त्यांच्या निधनापूर्वीचा तास-दोन तास अगोदरचा वृत्तांत त्यांच्या सख्ख्या बहिणीने लेखबंद केलेला आहे.त्यांच्या मुलाला त्यांनी आपल्या तीन इच्छा सांगितल्या. साधारणतः इच्छा म्हटल्यानंतर आपल्या मनामध्ये जरा वेगळा भाग येतो. त्यांनी त्यांची पहिली इच्छा अशी सांगितली की, आर्टिफिशल मेडिकल सपोर्टवर मला जगावयाचे नाही याची काळजी तू घे. दुसरी इच्छा त्यांनी अशी सांगितली की, माझा मृत्यू झाल्याबरोबर माझा हा देह मुलांच्या अभ्यासाठी मेडिकल हॉस्पिटलला देण्यात यावा. आणि तिसरी इच्छा त्यांनी अशी व्यक्त केली की, स्वातंत्र्य सैनिक या नात्याने मला दिल्लीमध्ये जे निवासस्थान मिळालेले आहे ते 30 दिवसात मोकळे झाले पाहिजे, याची काळजी तू घे. फार दुर्मिळ अशा प्रकारचे व्यक्तिमत्व प्रा. मधू दंडवते यांच्या निमित्ताने आमच्यातून निघून गेलेले आहे. विद्यार्थीदशेमध्येही त्यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची संधी त्यावेळी आम्हाला मिळाली याचा त्याही वेळेला आम्हाला अभिमान वाटत होता आणि आताही वाटतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख.....

राम आसुदोमल तोलानी हे आमच्यासोबत या सभागृहामध्ये कार्यरत होते. विशेषत: मराठी भाषिक नसतांनासुध्दा मराठी भाषा बोलण्याची धडपड ते करीत असत,त्यांची मला आजही आठवण झाल्याशिवाय रहात नाही. त्यांच्या बोलण्यामधला जो त्रोटकपणा होता तो सुध्दा सभागृह आनंदाने सहन करीत असे याची आठवण झाली म्हणजे तोलानी यांच्या दु:खद निधनाबद्दल मनापासून दु:ख होते. रतनलाल मोहनलाल यांच्याही दु:खद निधनाबद्दल मी मनापासून शोकभावना व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत ( नामनियुक्त) :सभापती महोदय, हा जो शोकप्रस्ताव येथे सादर करण्यात आलेला आहे तो अशा महनीय व्यक्तींचा आहे की, या सदनात मी पहिल्यांदाच शोकप्रस्तावावर बोलणार आहे. हया व्यक्ती फार मोठया होत्या.काही पदे व्यक्तींना शोभा देतात पण काही व्यक्ती पदांना शोभा देतात. दिवंगत राष्ट्रपती के.आर.नारायणन साहेब यांचा उल्लेख करावयाचा झाला तर माझ्या आठवणीतील ते एक महत्वाचा भाग आहेत. मी संसदेमध्ये निवडून गेल्या नंतर त्यावेळेला कै. नारायणन हे संसदेमध्ये शेवटच्या बाकावर बसावयाचे. ते अतिशय मितभाषी होते. मला असा एक प्रसंग आठवतो. त्यावेळेला संसदेमध्ये असा एक प्रसंग निर्माण झाला होता आणि मी त्या विषयावर फार संतापलो होतो व मी सभागृहातून बाहेर जात होतो. त्यावेळी त्यांनी मला बोलावले. त्यांच्या हातात एक पुस्तक होते. त्यांनी ते पुस्तक मला दिले आणि एवढेच सांगितले की, राजकारणामध्ये आपल्या भावना चेह-यावर येऊ द्यावयाच्या नसतात. त्यानंतर त्यांच्याशी माझा जास्त संबंध आला. ते अनेक वर्षे वेगवेगळया पदावर काम करीत होते. त्या सर्व पदांवर काम करीत असतांना जाणीवपूर्वक मला ते अनुभवायला मिळाले. विद्वतेचे परम शिखर कोणी एक व्यक्ती गाठू शकते ..........................................................................

यानंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत.......

असे हे के.आर.नारायणन् होते. एका मागासवर्गीय कुटुंबात जन्मलेली व्यक्ती देशाच्या पातळीवर एवढया मोठया शिखरावर जाऊ शकेल याची कल्पना सुध्दा करता येणार नाही. एकविसाव्या शतकानंतर भारताचे स्थान काय असले पाहिजे ही त्यांची ठाम भूमिका होती, कल्पना होती. कारगिलच्या युध्दाच्या वेळी असो अथवा कोंकणातील बॉम्बस्फोटासंबंधी असो त्यावेळी त्यांनी जो सल्ला राष्ट्राला दिला होता तसेच जे विचार त्यांनी मांडले होते त्यातील सर्वात महत्वाचा दुवा मला आठवतो. आम्ही त्यांच्याकडे या युध्दाच्या प्रसंगी गेलो होतो त्यावेळी त्यांनी एकच सांगितले की, राष्ट्राला जर मोठे करावयाचे असेल तर त्यावेळेस फक्त दोन दिशांकडे लक्ष ठेवावे. राष्ट्राच्या सुरक्षेबाबत सर्वांना काम करावे लागणार आहे. National consciousness is the foundation of national strength. असे त्यांनी म्हटले आहे. आणि म्हणून त्या काळात त्यांनी आपल्या देशाची भूमिका होती ती चांगल्या प्रकारे बजाविण्यामध्ये काम केलेले आहे. महोदय, त्याचबरोबर प्रा. मधू दंडवते यांच्याबद्दल बोलावयाचे झाले तर पुर्वीपासूनच त्यांचे आणि माझे अगदी जवळचे संबंध होते. बॅ. नाथ पै यांचे अचानक निधन झाल्यानंतर लोकसभेसाठी राजापूर मतदारसंघातून त्यांना निवडणूक लढविण्याचा प्रसंग आला त्यावेळी बॅ. नाथ पै यांची कीर्ती आणि महती एवढी मोठी होती की, अशा महनीय व्यक्तिची परंपरा हे चालवू शकतील की नाही असा प्रश्न लोकांना पडला होता. पण निवडून आल्यानंतर त्यांनी अशा पध्दतीने काम केले की, त्या पदाला शोभा तर दिलीच पण पार्लमेंटरी डेमोक्रेसीमध्ये एक उत्तम आदर्शही त्यांनी निर्माण केला. सन 1991 साली ज्यावेळी अचानक मी राजकारणात आलो आणि त्यांच्याविरुध्द निवडणूक लढविण्याची वेळ माझ्यावर आली त्यावेळी अर्जांच्या छाननीच्या वेळी त्यांची आणि माझी भेट झाली. त्या ठिकाणी भेटल्यानंतर त्यांनी मला शुभेच्छा दिल्या व सांगितले की, तू नव्याने या प्रवाहात आलेला आहेस, तुला माझ्या शुभेच्छा. अशा प्रकारे त्यांनी मला शुभेच्छा आणि आशिर्वादही दिला. तसेच ज्यावेळी मी निवडून आलो त्यावेळी पहिल्यांदा माझे स्वागत कोणी केले असेल तर ते प्रा. मधू दंडवते यांनीच, अशा खिलाडू वृत्तीचे प्रा. मधू दंडवते हे होते. त्यानंतर संसदेतील कामकाजाच्या संदर्भात देखील मला त्यांचे वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन लाभले. बॅ. नाथ पै तसेच प्रा. मधू दंडवते यांच्या पार्श्वभूमीवर ती जागा चालवावयाचे म्हणजे हे काम सोपे नव्हते. त्यांनी

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत ......

मला पार्लमेंटरी प्रोसिजरसंदर्भात "कौल आणि शकधर" हे अत्यंत महत्वाचे पुस्तक दिले होते, एवढा त्यांच्या मनाचा मोठेपणा होता. तसेच त्यांनी एक गोष्ट मला फार मार्मिक अशी सांगितली होती व ती म्हणजे संसदेमध्ये जर यशस्वी व्हावयाचे असेल तर स्पिकरचे बोट आणि बेल याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. ज्यावेळेस स्पिकरचे बोट आपल्याकडे येत आहे अशी जाणीव आपल्याला होते त्यावेळी "महोदय, एक शेवटचा मुद्दा म्हणून सांगतो की," असे म्हणावे तर ज्यावेळी आपल्याकरिता चेअरवरुन बेल मारल्याची जाणीव होते त्यावेळी "महोदय, शेवटी एवढेच सांगू इच्छितो की," अशा प्रकारे वाक्याचा उपयोग करीत आपले भाषण सुरु ठेवावे, अशा प्रकारे त्यांनी मार्गदर्शन केल्याचे मला आजही आठवत आहे. तसेच त्यांच्या कारकिर्दीत कोंकण रेल्वेचे काम झाले हेही आपल्याला विसरता येणार नाही. ज्यावेळी प्रा. मधू दंडवते पहिल्यांदा निवडणूक लढवून आले त्यावेळी माझे वडिल त्यावेळी आमदार होते, आमच्या घरी ते पहिल्यांदाच आले होते. त्यांनी कोंकणातील जनतेच्या मनावर विशिष्ट स्थान निर्माण केले आहे. अशा नेत्याच्या आत्म्याला शांती लाभो अशी मी प्रार्थना करतो. त्याचबरोबर सर्वश्री रतनलाल मोहनलाल आणि राम आसुदोमल तोलानी या सदस्यांच्या दु:खद निधनाबद्दल मी श्रध्दांजली अर्पण करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

-------------

यानंतर कु. थोरात......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे ( महसूल मंत्री ) : मा. सभापती महोदय, या सभागृहाचे नेते, आणि या राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील साहेबांनी कै. के.आर.नारायणन, माजी राष्ट्रपती, सर्वश्री रतनलाल मोहनलाल, राम आसुदोमल तोलानी व प्रा. मधु रामचंद्र दंडवते माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. या ठिकाणी मा. उपमुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील, विरोधी पक्ष नेते, तसेच अन्य मान्यवरांनी कै. के.आर.नारायणन तसेच कै. रतनलाल मोहनलाल तसेच राम आसुदोमल तोलानी व प्रा. मधु दंडवते यांच्या निधनाबद्दल आपले विचार व्यक्त केलेले आहेत. या ठिकाणी मान्यवरांनी जे विचार मांडलेले आहेत त्याच्याशी मी सहमत आहे.

मी या ठिकाणी सुरुवातीला प्रा. मधु दंडवते यांच्या बद्दल माझे विचार व्यक्त करणार आहे. कै. प्रा. मधु दंडवते हे कोकणातील राजापूर लोकसभा मतदार संघातून सलग 5 वेळा निवडून गेले होते. त्यांचे आणि माझे फार जवळचे संबंध होते. अनेक वैधानिक, सामाजिक कामे करतांना अनेक वेळा आम्ही एकत्र आलो होतो. त्यामुळे या ठिकाणी त्यांना श्रध्दांजली वाहतांना मला तीव्र दु:ख होत आहे. कोकणाबद्दल आस्था, प्रेम असणारी व्यक्ती आमच्यातून निघून गेलेली आहे. कोकणातील डोंगर कपा-यातून, सहयाद्रीच्या ऊंच परिसरातून आज जी कोकण रेल्वे धावत आहे ती कै. प्रा. मधु दंडवते यांच्या कार्यामुळेच. ज्यांनी कोकणात रेल्वे आणली ते प्रा. मधु दंडवते आज हयात नाहीत याचे मला फार दु:ख होत आहे. कै. प्रा. मधु दंडवते हे हयात असतांनाच कोकणातून रेल्वे धावली होती. कोकणात कधी रेल्वे येईल असे कोकणी माणसाला कधी स्वप्नातही वाटतही नव्हते. असे असतांनाही त्यांनी डोंगर कपा-यातून आपल्या कर्तृत्वाने कोकणामध्ये रेल्वे आणली. त्यांनी आपल्या हयातीमध्ये कोकण रेल्वेतून प्रवासही केला होता. आपण दिलेल्या आश्वासनपूर्ती बद्दल त्यांनी समाधानही व्यक्त केले होते. या ठिकाणी ब-यांच सन्माननीय सदस्यांनी कै. प्रा. मधु दंडवते यांच्या व्यक्तिमत्वाबद्दल आपले विचार मांडलेले आहेत. राजकारणी व्यक्तिंना, लोकप्रतिनिधींना मार्गदर्शन व्हावे असे आदर्श व्यक्तिमत्व त्यांचे होते. राजकारणी व्यक्तिंनी चारित्र्य संपन्न कसे रहावे, जनतेशी बांधिलकी कशी ठेवावी, जनतेचे प्रश्न सोडवितांना संसदेत प्रश्न मांडून ते कसे सोडवून घ्यावेत याचे कौशल्य लोकप्रतिनिधींनी त्यांच्याकडून शिकण्यासारखे होते. कै. प्रा. मधु दंडवते यांच्या नावामध्येच मधुरपणा होता, त्यामुळेच ते लोकसभेत 5 वेळेस निवडून गेले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MHM/ SBT/

श्री. नारायण राणे.......

त्यांनी आपल्या कार्यकाळात खासदार म्हणून, रेल्वे मंत्री म्हणून आणि अर्थ मंत्री म्हणून पदे भुषविली होती. कै. प्रा. मधु दंडवते यांचे या देशातील राजकारणामध्ये आणि विकासामध्ये फार मोठया मोलाचे सहकार्य आहे. राजकीय आणि सामान्य नागरिकही त्यांना चांगल्या प्रकारे ओळखत होते. त्यांचे काम आणि कार्य सर्वांना हळहळ लावण्यासारखे होते. कै. प्रा. मधु दंडवते हे शेवटच्या काळात जेव्हा जसलोक हॉस्पीटलमध्ये ॲडमिट होते तेव्हा मी त्यांना भेटावयास गेलो होतो. त्यांनी शेवटच्या दिवसामध्येही मला विचारले, "आता कोकणामध्ये काय चालले आहे"? त्यांनी आपल्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणीसुध्दा कोकणामध्ये कशा प्रकारचा विकास चालू आहे याची माहिती घेतली. खरे म्हणजे त्यांचा जन्म अहमनगरचा परंतु त्यांनी राजापूर लोकसभा मतदार संघाची निवड केली तेव्हा पासून त्यांची कर्मभूमी ही कोकणच राहिली होती. त्यांनी आपल्या कामाने आणि कर्तृत्वाने कोकणावर एक वेगळया प्रकारचा ठसा उमटवलेला आहे. त्यांनी आपल्या कर्तृत्वाने कोकणावर राजकारणी व्यक्ती म्हणून ठसा उमटवलेला आहे. त्यांच्या नावातच मधु असल्यामुळेच ते मधुर होते. ते प्रत्येक माणसाशी मधुर वाणीमध्येच बोलत असत, त्यामुळेच त्यांना सर्वजण मानसन्मान देत असत.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

सभापती महोदय,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे....

शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी कोकणवासियांसाठी काम केले आहे. सन 1986 साली त्यांचा लोकसभा निवडणुकीत पराभव झाला. प्रा.मधु दडवंते यांचा पराभव झाला हे जेव्हा कलेक्टरनी जाहीर केले तेव्हा त्यांनी आपला पराभव देखील मान्य केला. त्यावेळी माझ्या तत्कालीन पक्षाचे उमेदवार श्री.सुरेश प्रभु हे निवडून आले. त्यावेळी श्री.सुरेश प्रभू हे निवडून आले याचा मला आनंद तर होताच, पण त्याच बरोबर प्रा.मधु दंडवते सारखा उत्कृष्ट संसदपटू पडल्याचे दु:ख देखील होते. कारण त्यांची देशाला गरज होती. त्यांच्यामध्ये असामान्य असे नेतृत्त्व गुण होते. ते शेवटच्या श्वासापर्यंत, क्षणापर्यंत कोकणाचा विचार करीत होते. मुंबई विधान भवनामध्ये मी त्यांची गॅटवरील भाषणे ऐकली आहेत. लोकप्रतिनिधींनी आपली कर्तव्य कशी पाळावीत हे प्रा.दंडवते यांच्या अनुभवातून शिकले पाहिजे. अर्थसंकल्प कसा मांडावा, अर्थसंकल्पावरील भाषणावर आपले विचार कसे मांडावेत यांसबंधीचे प्रा.मधु दंडवते यांचे विचार मी ऐकले आहेत. आम्ही प्रा.मधु दंडवते यांना 'नाना' म्हणून संबोधत होतो. ज्या ज्या वेळी ते मला ट्रेनमध्ये भेटत त्या त्यावेळी ते कोकणच्या विकासाच्या गप्पा करीत असत. कोकणच्या विकासासाठी ते वेगवेगळया योजना सुचवत. नानांच्या जाण्यामुळे मला फार तीव्र दु:ख होत आहे. मी माझ्या पोटनिवडणुकीच्या प्रचारात असल्यामुळे मला त्यांचे शेवटचे दर्शन घेण्याची संधी मिळाली नाही, याचे मला अतीव दु:ख होत आहे. नानांनी कोकणच्या विकास केल्यामुळे कोकणवासियांच्या मनात नानांबद्दल आत्मियता निर्माण झाली. त्यामुळेच कोकणी माणसे त्यांना कधीही विसरणार नाहीत. एवढेच नव्हे तर देशातील जनता देखील त्यांना विसरणार नाही, असे मला वाटते. प्रा.मधु दंडवते यांनी विविध क्षेत्रामध्ये आपले गुण दाखवून दिले आहेत. ते आजच्या लोकप्रतिनिधींनी आत्मसात करणे गरजेचे आहे. ते देशासाठी, राज्यासाठी आवश्यक आहे. त्यांचे गुण आपण आत्मसात केले तर तोच खरा शोकप्रस्तावाचा गाभा ठरेल असे मला सर्वांना सांगावेसे वाटते. सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी अन्य दिवंगत माजी सन्माननीय सदस्यांबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे, त्यासंबंधी मी श्रध्दांजली व्यक्त करून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

.....

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरूनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते आणि राज्याचे उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी माजी राष्ट्रपती श्री.के.आर.नारायणन, सर्वश्री रतनलाल मोहनलाल, राम आसुदोमल तोलानी व प्रा.मधु दंडवते यांच्या दु:खद निधनानिमित्त जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्याला संमती दर्शविण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माजी राष्ट्रपती श्री.के.आर.नारायणन यांच्या दु:खद निधनानिमित्त सभागृहामध्ये बोलत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केल्या आहेत की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतर देशाच्या उत्तुंग पदावर पोहोचलेली दलित व्यक्ती म्हणजे श्री.के.आर.नारायणन. श्री.के.आर.नारायणन हे दलित नेते होते. त्यांनी राष्ट्रपती म्हणून काम केले. त्यांनी आपल्या कर्तृत्त्वाचा ठसा तेथे उमटविला आहे. सभापती महोदय, श्री.के.आर.नारायणन अत्यंत गरीबीत वाढले.

यानंतर अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी........

एकीकडे त्यांनी दारिद्र्य सोसले तर दुसरीकडे विद्वत्तेच्या व बुध्दीमत्तेच्या जोरावर राष्ट्रपती पदावर पोहोचले. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल माझ्या पक्षाच्या वतीने आणि माझ्यातर्फे त्यांना आदरांजली व्यक्त करतो.

कै.राम तोलानी आमचे सहकारी. श्री.एन.एम.कांबळे काँगेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष असताना कै.राम तोलानी त्यांचे सहकारी व काँग्रेस पक्षाचे एक पदाधिकारी म्हणून काम करीत होते. त्यावेळी कै.वसंतदादा पाटील राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यांच्यामुळे कै.राम तोलानी यांना या सभागृहात येण्याची संधी प्राप्त झाली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाल्यानंतर कै.राम तोलानी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आले आणि पक्षाचे काम करीत राहिले. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल माझ्या पक्षाच्या वतीने आणि माझ्यातर्फे त्यांना आदरांजली अर्पण करतो.

कै.प्रा.मधु दंडवते यांचा जन्म अहमदनगर येथे झाला परंतु त्यांची कर्मभूमी कोकण राहिली. 1980 मध्ये सिंधुदुर्ग जिल्हा झाला. अगोदर उत्तर कोकण आणि दक्षिण कोकण असे संबोधिले जायचे. उत्तर कोकण म्हणजे रत्नागिरी आणि दक्षिण कोकण म्हणजे सिंधुदुर्ग. 1952 मध्ये राजापूर लोकसभा मतदार संघातून काँग्रेस पक्षाचे उमेदवार श्री.मोरोपंत जोशी निवडून आले. त्यानंतर 1957 पासून 1971 पर्यंत बॅ.नाथ पै निवडून आले. 1971 पासून 1991 पर्यंत त्या मतदार संघातून प्रा.मधु दंडवते निवडून आले. असा एका विचारांचा राजकीय प्रवाह दुसऱ्या कोणत्याही राज्याच्या लोकसभा मतदासंघात पहावयास मिळाला नाही. 1991 साली त्या मतदार संघातून मेजर सुधीर सावंत निवडून आले होते. त्यावेळी देशाचे पंतप्रधान श्री.राजीव गांधी यांचे दुःखद निधन झाले होते. त्यानंतर पुन्हा 1995 च्या लोकसभा निवडणुकीत प्रा.मधु दंडवते निवडून आले. आम्ही लहानपणी पिंपळाच्या झाडाखाली एकत्र यायचो आणि मत कोणाला मिळणार तर बॅ.नाथ पैं यांना मिळणार असे एकमेकांना सांगायचो. बॅ.नाथ पै लोकसभा सभागृहात बोलावयास उभे राहिले तर पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु हे कोठेही असले तरी त्यांचे भाषण ऐकायला सभागृहात उपस्थित राहत असे. एके दिवशी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी बॅ.नाथ पै यांना विचारणा केली की, आमच्या सरकारचा ॲम्बेसॅडर म्हणून "युनो"ला जाणार का, त्यावर ते म्हणाले की, आपण चांगली सूचना केलेली आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी....

पण नेहरु सरकारतर्फे अँबेसेडर म्हणून त्या ठिकाणी जाणार नाही, माझ्या पक्षाचे सरकार आल्यानंतर अँबेसेडर म्हणून त्या ठिकाणी जाईन. ही परंपरा प्रा.मधु दंडवते यांनी 1971 पासून ठेवली. 1977 मध्ये सावंतवाडीमधून श्री.शिवराम भोसले उभे होते. त्या ठिकाणी प्रा.मधु दंडवते यांची सभा झाली व त्यांनी कोकण रेल्वेची संकल्पना मांडून कोकणात रेल्वे आणावयाची असे सांगितल्यावर आम्ही टिंगलटवाळी केली. कोकणामध्ये रेल्वे येऊ शकत नाही असे आम्ही म्हटले होते. त्यावेळी रोह्यापर्यंत रेल्वे आली होती, परंतु पुढे ती येणार नाही असे आम्ही सांगत होतो. परंतु कोकणी माणसाचे कोकण रेल्वेचे जे स्वप्न होते ते त्यांनी पूर्ण केले. या ठिकाणी प्रा.मधु दंडवते यांच्या निधनाबद्दल जो प्रस्ताव आला आहे त्या प्रस्तावाला माझ्या पक्षाच्या वतीने या दिवंगत नेत्यांना श्रध्दांजली अर्पण करुन, माझे दोन शब्द संपवितो.

-----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, या देशाचे माजी राष्ट्रपती श्री.के.आर.नारायणन, सर्वश्री राम आसुदोमल तोलानी, रतनलाल मोहनलाल आणि प्रा.मधु दंडवते यांच्या निधनाबद्दल मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी जो शोक प्रस्ताव या ठिकाणी मांडला आहे त्याला पाठिंबा देऊन, त्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

प्रा.मधु दंडवते यांच्याविषयी मी प्रथम बोलू इच्छितो. त्यांचा आणि माझा परिचय होता आणि मला त्यांचा सहवास सुध्दा लाभलेला होता. प्रजा समाजवादी पक्षाच्या वातावरणात, शिवसेना स्थापन झाल्यानंतर जे आंदोलन झाले ते सीमाप्रश्नाबाबतचे होते. दुर्दैवाने तो प्रश्न आज पुन्हा उभा राहिला आहे. त्यावेळी प्रा.मधु दंडवते यांनी त्या आंदोलनामध्ये हिरीरीने भाग घेतला. मी त्यावेळी शिवडीत होतो. शिवडीमध्ये आंदोलन दारात पोहोचलेले असताना प्रा.मधु दंडवते आणि एस.एम.जोशी त्या ठिकाणी आले आणि रस्त्यावर त्यांनी सभा घेतली व भाषण केले. त्यामुळे जो पेटलेला मॉब होता तो शांत झाला, याचे श्रेय सर्वस्वी प्रा.दंडवते यांना देणे योग्य होईल. एका आंदोलनामध्ये जनता तर पोलिसांना मारहाण करण्यापर्यंत गेली होती. मूल्याधिष्ठीत जीवनप्रणाली, राजकारण, समाजकारण यांचा ऱ्हास आज होताना आपण पाहत आहोत. अशा परिस्थितीत त्यांचे जाणे वेदना देणारे आहे. ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सिध्दार्थ महाविद्यालयामध्ये न्युक्लेअर फिजिक्सचे प्राध्यापक होते. कार्ल मार्क्स आणि महात्मा गांधी यांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. त्यांच्या विचाराने आपण पुढे गेलो तर देश पुढे जाईल असे त्यांचे मत होते. त्या विचाराने ते जात असत. प्रा.मधु दंडवते हे मूळ नगरचे होते. परंतु नंतर ते कोकणात निवडून आले. राजकारणात तत्वांशी तडजोड न करणारे तसेच नितीमूल्य जपणारे असे ते नेते होते. परंतु आज तसे नेते कोठे दिसत नाहीत. रेल्वेच्या उद्घाटनाच्या प्रसंगी त्यांनी भाषण केले हाते. आपण नेहमी प्रश्न करतो की, आधी अंडे की, आधी कोंबडी. त्यांनी सांगितले की, आधी अंडे आले की कोंबडी येणार आणि आधी कोंबडी आली की अंडे येणार याचा विचार करुन मी पुढे सरकलो आहे. अशा एका विज्ञाननिष्ठ माणसाचे जाणे आपल्या समाजाला दु:ख देणारे आहे. गोवा मुक्ती संग्राम, स्वातंत्र्य आंदोलन आणि संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात त्यांचा सहभाग होता.

नंतर श्री.गायकवाड....

श्री.अरविंद सावंत ..

आज दुर्देवाने आपण हे विसरतो की,गोवा मुक्ती संग्रामाच्या आंदोलनात त्यांनी भाग घेतला होता.त्यांच्या व्यक्तिमत्वाबद्दल मला आणखी एक गोष्ट आठवली असून त्याचा मी या ठिकाणी उल्लेख करु इच्छितो. माजी सन्माननीय सदस्य श्री.सदानंद वर्दे यांनी प्रा.मधू दंडवते यांच्या बद्दल असा उल्लेख केला होता की,

" प्रा.मधू दंडवते हे विव्दान होते पण अहंकारी नव्हते, त्यागी होते पण तुसडे नव्हते, धगधगते होते पण तापट नव्हते, संवेदनशील होते पण भावनेपोटी वाहत जाणारे नव्हते. रसिक होते पण रुक्ष नव्हते, संघर्षात तळपणारे होते पण रचनेचे भोक्ते नव्हते, नेते होते पण " लीडर " नव्हते ."

सभापती महोदय, प्रा.मधू दंडवते यांनी मृत्यूनंतर देहदान करण्याचे ठरविले होते. आपला देह समाजाच्या उपयोगी पडावा असा विचार करुन त्यांनी देहदान करण्याचे ठरविले होते. मृत्यू नंतर आपल्या देहाचा उपयोग विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी व्हावा या एका चांगल्या हेतूने त्यांनी हा निर्णय घेतला होता. अशा या थोर समाजवादी व्यक्तीचे दु:खद निधन झालेले आहे. त्यांच्या निधनाबद्दल मी मन:पूर्वक श्रध्दांजली अर्पण करतो.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2..

प्रा.जोगेन्द्र कवाडे (नामनियुक्त) :सभापती महोदय, माजी राष्ट्रपती श्री.के.आर.नारायणन, माजी सन्माननीय सदस्य सर्वश्री रतनलाल मोहनलाल,राम आसुदोमल तोलानी व प्रा.मधू रामचन्द्र दंडवते यांच्या दु:खद निधनाबद्दल माननीय उप मुख्यमंत्र्यांनी शोक प्रस्ताव मांडलेला आहे. त्या शोक प्रस्तावाबद्दल माझ्या शोक संवेदना व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, श्री.के.आर.नारायणन हे केरळ राज्यामध्ये जातीयतेने बरबटलेल्या अशा व्यवस्थेमध्ये अस्पृश्य , दलित समाजात जन्माला आले होते. मोडक्या तोडक्या घरात राहून आपल्या घरापासून वीस किलोमीटर्स अंतरावर असलेल्या एका शाळेत त्यांनी आपले शालेय शिक्षण घेतले होते. 20 किलोमीटर अंतरावर पायी जाऊन शिक्षण घेणारा हा दलित समाजातील तरुण देशाच्या सर्वोच्च पदावर आरुढ झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्य घटनेच्या माध्यमातून या देशाची संसदीय लोकशाही प्रणाली निर्माण केली होती त्याचाच हा अविष्कार आहे असे मानावे लागेल. श्री.के.आर.नारायणन हे मृदुभाषी व मितभाषी होते. ते अत्यंत प्रज्ञावान, मुत्सद्दी व विव्दान होते. अशा प्रकारे त्यांच्या जीवनाला अनेक कंगोरे लाभले होते.देशाचे दहावे राष्ट्रपती म्हणून त्यांची कारकिर्द अत्यंत तेजस्वी अशी राहिली होती.राष्ट्रपती होण्याच्या अगोदर ते उपराष्ट्रपती होते. एका समारंभाच्या निमित्ताने मला उपराष्ट्रपती भवनामध्ये जाण्याचा एकदा योग आला होता. विदर्भातील कामगार नेते श्री.दादासाहेब कुंभारे यांच्या स्मृती ग्रंथाचे प्रकाशन श्री.के.आर.नारायणन यांच्या हस्ते उपराष्ट्रपती भवनात झाले होते. तेव्हा मी तेथे गेलो होतो. हा प्रकाशन समारंभ संपल्यानंतर आणि सर्व पाहुणे मंडळी तेथून निघून गेल्यानंतर त्यांनी मला थांबवून घेतले आणि माझ्या बरोबर काही विषयाच्या संदर्भात चर्चा केली होती. श्री.के.आर.नारायणन हे सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी विभागाचे राज्यमंत्री होते. त्यावेळी आंध्र प्रदेशात निझामाबाद जिल्हयातील माणिक भंडार नावाच्या एका गावामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयाचे अनावरण त्यांच्या हस्ते केले जाणार होते आणि त्या समारंभाचा अध्यक्ष मी होतो. ही ओळख त्यांनी जपून ठेवली होती आणि त्याच ओळखीच्या जोरावर त्यांनी मला थांबवून घेतले होते आणि दलित, आदिवासी,,इतर मागासवर्ग या समाजाच्या विविध प्रश्नांच्या संदर्भात त्यांनी माझ्या बरोबर पंधरा ते वीस मिनिटे चर्चा केली होती.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे ...

असे हे व्यक्तीमत्त्व होते. त्यांनी वेगवेगळ्या राष्ट्रांमध्ये आपल्या देशाचा गौरव वाढविण्याचे काम केले आहे. राजदूत म्हणून चीन, अमेरिका, कंबोडिया मध्ये ते राहिले आणि आपल्या देशाचे वैभव इतर देशांमध्ये मांडण्याचे उत्कृष्ट काम त्यांनी केले आहे. ते एक दलित राष्ट्रपती होते असे म्हणण्यापेक्षा मी तर असे म्हणेन की, या देशाच्या लोकशाही व्यवस्थेने एका दलित माणसाला देखील या देशातील सर्वोच्च पदावर आरूढ होण्याचा मान दिला आहे. आमच्या एका सन्माननीय मित्राने सांगितले की, काही पदांमुळे व्यक्तीचा गौरव वाढतो तर काही व्यक्तींमुळे, माणसांमुळे त्या पदाचा गौरव वाढत असतो. श्री. के.आर.नारायणन् यांच्यामुळे त्यांनी भूषविलेल्या सर्व पदांचा मान, गौरव वाढलेला आहे असे मला येथे आवर्जून नमूद करावेसे वाटते. त्यांच्या विद्वान, मुत्सद्दी व्यक्तीमत्त्वामुळे राष्ट्रपतीपदाचा गौरव हा निश्चितपणे वाढला आहे असे मला आवर्जून सांगावेसे वाटते. विशेषत: गुजराथ दंगलीसंबंधात त्यांनी जी संवेदनशील भूमिका घेतली होती ती भूमिका या देशामध्ये आज देखील कोणीही विसरू शकत नाही. असा हा विद्वान माणूस, जो राष्ट्रपती पदापर्यंत पोहोचला होता, आपल्या देशाने आज गमावलेला आहे याचे आपणा सर्वांनाच दु:ख आहे.

सभापती महोदय, स्व. रतनलाल मोहनलाल, स्व. राम तोलानी हे आपल्या सदनाचे सदस्य होते आणि त्या सदस्यत्त्वाच्या काळामध्ये त्यांनी या सभागृहामध्ये मोलाचे योगदान दिलेले आहे ते कोणीही विसरू शकणार नाही.

सभापती महोदय, प्रा. मधु दंडवते यांच्याबद्दल बोलावयाचे झाले तर समाजवादी चळवळी मध्ये धूळ उडविणारे बरेच नेते झाले. परंतु एक सच्चा समाजवादी विचारवंत म्हणून त्यांचे नाव आपल्याला घेता येईल. अत्यंत प्रामाणिकपणे, निष्ठावानपणे, मूल्याधिष्ठित राजकारण करणारे असे हे व्यक्तीमत्त्व आता काळाच्या पडद्याआड गेलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या सिद्धार्थ महाविद्यालयामध्ये भौतिक शास्त्राचे प्राध्यापक म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रा.मधु दंडवते यांची नेमणूक केली होती. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये तर त्यांनी योगदान दिलेलेच आहे, त्यासाठी तुरूंगवास देखील भोगला आहे. पण गोवा मुक्ती संग्राम जो झाला त्यामध्ये सहभागी होण्यासाठी त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबडेकर यांच्याकडे परवानगी मागितली असता त्यांनी त्यांचे कौतुक केले आणि त्यांना म्हणाले की, प्राध्यापक म्हणून काम करीत असतानाही तुम्ही या लढ्यामध्ये भाग घेत आहात त्याबद्दल मला आंनद वाटतो. असे

...... एम 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे .....

म्हणून त्यांनी त्यांना गोवा मुक्ती संग्रामामध्ये भाग घेण्याची अनुमती दिली. ही त्यांच्या जीवनातील एक अत्यंत मोलाची अशी घटना आहे. सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे "States & Minorities" म्हणून एक चांगले विचारांचे पुस्तक आहे. त्यामध्ये State Socialism म्हणजे राज्य समाजवाद हा जो विषय त्यांनी मांडला आहे तो विचार प्रा.मधु दंडवते यांनी देखील उचलून धरला. सरकार कोणतेही असले तरी समाजवाद विचारसरणी स्वीकारूनच राज्य पुढे जाऊ शकते असे प्रा. मधु दंडवते यांनी देखील सांगितले आहे. प्रा. मधु दंडवते हे एक उत्कृष्ट संसदपटू तर होतेच पण त्यांनी कोकण रेल्वे प्रत्यक्षात येण्यासाठी म्हणून जे योगदान दिलेले आहे ते या राज्यातील कोणीही माणूस विसरू शकत नाही. असा हा विद्वान, साधी राहणी आणि उच्च विचारसरणी असलेला उत्कृष्ट संसदपटू आता काळाच्या पडद्याआड गेला आहे.

सभापती महोदय, माजी राष्ट्रपती कै. के.आर.नारायणन्, स्व. रतनलाल मोहनलाल, स्व. राम तोलानी आणि कै. प्रा. मधु दंडवते यांच्या स्मृतीस मी आदरांजली वाहतो. धन्यवाद.

****

( यानंतर श्री. सरफरे ..... एन 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते व उपमुख्यमंत्री माननीय श्री. आर. आर. पाटील यांनी या देशाचे माजी राष्ट्रपती श्री. के.आर. नारायणन व या सभागृहाचे माजी सदस्य सर्वश्री रतनलाल मोहनलाल, राम आसुदोमल तोलानी व प्रा. मधु रामचंद्र दंडवते यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्यावर सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

माननीय माजी राष्ट्रपती कै. के. आर. नारायणन यांचेबद्दल बोलायचे झाले तर त्यांचे वर्णन माझ्या अगोदरच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी केले आहे. परंतु आदरणीय प्रा. बी.टी. देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्वाचा, विचाराचा पगडा, व त्या समन्वयातून जडण घडण झालेले व्यक्तिमत्व म्हणजे कै. के.आर. नारायणन. केरळसारख्या त्यावेळच्या त्रावणकोर संस्थानामध्ये शिक्षण घेतांना त्या संस्थानाच्या काळात त्यावेळची सामाजिक अवस्था व व्यवस्था ही भयानक असतांना त्यांनी पदवी पर्यंतचे शालेय शिक्षण पूर्ण करीत असतांना ते प्रथम श्रेणीत प्रथम आले. परंतु त्यांना त्रावणकोर संस्थानात नोकरी देतांना मात्र त्यांच्यापेक्षा कनिष्ठ मार्क मिळविलेल्या माणसाची वरच्या दर्जावर नेमणूक केली व कै. के.आर. नारायणन यांची कनिष्ठ जागेवर नेमणूक केली. त्यामुळे त्यांच्या मनाला वेदना झाल्या व त्यांचे मन बंड करुन उठले. आणि आता नोकरी करावयाची नाही असे ठरवून ते बाहेर पडले,व जिद्दीने उभे राहिले. पत्रकारिता, शिक्षकी पेशा अशा विविध क्षेत्रामध्ये काम करीत लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधून त्यांनी प्रथम श्रेणीमध्ये सर्वोच्च पदवी संपादन केली. याठिकाणी सांगितले पाहिजे की, लंडनच्या स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे प्राध्यापक हेरॉल्ड लास्की यांनी त्यावेळचे भारताचे पंतप्रधान स्वर्गीय पंडित जवाहरलाल नेहरु यांना एक पत्र लिहिले की, भारतातील एका अत्यंत विद्वान, बुध्दिमान विद्यार्थ्याने नुकतीच उत्तम पदवी मिळविली आहे, व सर्वोच्च मानाची अशी पदवी मिळवून तो भारतात येत आहे, आपल्या देशात येत आहे. तेव्हा आपण त्याला संधी द्या. अशा आशयाचे पत्र होते. पंडित जवाहरलाल नेहरु यांनी ते पत्र पाहिले. ते पत्र पाहिल्यानंतर थोडी नियमावली शिथिल करुन, बाजूला करुन पंडित जवाहरलाल नेहरु यांनी त्यांची नियुक्ती केली. आजच्या पार्श्वभूमीवर मला वाटते की, आज जर अशी नेमणूक कुणी केली असती तर कदाचित कुणी तरी कोर्टामध्ये रिट फाईल केली असती. त्यांच्या नेमणुकीवर कदाचित गदाही आणली असती. परंतु तो काळ असा होता की, ज्यांना पत्र दिले ते के.आर. नारायणन होते, ज्यांनी

श्री. उल्हास पवार...

ते पत्र दिले ते प्रिन्सिपॉल हेरॉल्ड लास्की होते, आणि ज्यांनी त्यांची नियुक्ती केली ते स्वर्गीय पंडित जवाहरलाल नेहरु होते. असे या के.आर. नारायणन साहेबांचे व्यक्तिमत्व होते. अनेक देशांमध्ये परराष्ट्रसेवेमध्ये विविध पदांवर काम करीत असतांना भारताचे राजदूत म्हणून अतिशय उत्तम प्रकारे त्यांनी भूमिका बजावली. अशी विविध पदे भूषवून ते लोकसभेमध्ये आले व मंत्री झाले. उपराष्ट्रपती झाले आणि भारतासारख्या खंडप्राय देशाचे राष्ट्रपती पदासारखे सर्वोच्च मानाचे पद त्यांनी भूषविले. ही तुमच्या आमच्या सर्वांना आनंदाची आणि अत्यंत अभिमान बाळगावा अशी गोष्ट आहे. आजही आपण इंग्लंड व अमेरिकेला प्रगत राष्ट्र म्हणतो. त्या राष्ट्रामध्ये सुध्दा काळा माणूस, शोषित आणि वंचित माणूस देशाचा राष्ट्रपती होऊ शकत नाही. परंतु परमपूज्य राष्ट्रपिता महात्मा गांधी, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले आणि या भारतीय सामाजिक संस्कृतीमध्ये घडलेले नेते यांच्या समन्वयातून हा जो समाज या भारतामध्ये घडलेला आहे. सर्वात शोषित, सर्वांत वंचित माणूस सर्वोच्च पदावर पदावर बसावा असे राष्ट्रपिता महात्मा गांधीचे एक स्वप्न होते. ते स्वप्न राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या निधना नंतर कां होईना या देशामध्ये साकार झाले. आज पर्यंत इंग्लंड किंवा अमेरिकेमध्ये कोणत्याही काळया आणि पददलित माणसाला ही संधी उपलब्ध होऊ शकत नाही. याठिकाणी असलेल्या लोकशाहीचा, जनतेच्या सामाजिक मनाच्या उंचीचा आणि त्यांच्या विद्वत्तेचा केवळ ते दलित म्हणून नव्हेतर त्यांची विद्वता त्यांची बुध्दिमता त्यांचे योगदान मोठे होते म्हणूनच ते त्या पदावर पोहोचले.

प्राध्यापक मधु दंडवते यांच्याबद्दल असे म्हणता येईल की, ते भारतीय स्वातंत्र्य लढयातील एक लढवय्ये, गोवा मुक्ती लढयातील लढवय्ये म्हणून त्या फळीचे नेतृत्व करीत असतांना, त्यांच्या भोवतालीचे लोक पोर्तुगीजांच्या गोळीबाराला बळी पडले. परंतु मधु दंडवते यांनी नेतृत्व सोडले नाही. ते व त्यांच्या पत्नी यांनी स्वातंत्र्य युध्दामध्ये, गोव्याच्या मुक्ती लढयामध्ये महाराष्ट्र-बेळगाव सीमा प्रश्नामध्ये सातत्याने काम केले आहे.आता माननीय सदस्यांनी आठवण करुन दिली की, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सिध्दार्थ कॉलेजमध्ये ते प्राध्यापक होते.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार . . . .

तेव्हा त्यांच्या प्रिन्सीपॉलनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे छोटीशी तक्रार केली. तेव्हा कै.प्रा.मधु दंडवते हे चळवळीमध्ये काम करीत होते, त्यामुळे त्यांना सतत समाजामध्ये जावे लागत असे. त्याबाबतीत एक तक्रार करण्यात आली की, ते बऱ्याच वेळेला गैरहजर असतात, त्यामुळे विद्यार्थ्यांचे तास बुडतात. तेव्हा परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी एक वाक्य प्रिन्सीपॉलनां सांगितले की,तुमची तक्रार बरोबर आहे, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे तास बुडतात.पण त्यांचे तास हे या देशाच्या सेवेकरता अतिशय मोलाचे आहेत. त्यांच्याबद्दल तक्रार करावयाची नाही असे उद्‌गार परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी काढले. असे ते एक अत्यंत बुध्दीमान आणि उत्तम संसदपटू व्यक्तीमत्व होते आणि आज आपल्याला अभावाने पहावयास मिळते ती राजकारणातील सभ्यता, सुसंस्कृत पणा, तो कै.प्रा.मधु दंडवते यांच्या माध्यमातून आपल्याला सर्वांना पहावयास मिळाला. त्याचप्रमाणे या सदनाचे माजी सन्माननीय सदस्य श्री.रतनलाल मोहनलाल आणि दुसरे सन्माननीय सदस्य आणि आमचे मित्र श्री.राम तोलानी यांचेही दु:खद निधन झाले आहे. सन्माननीय सदस्य कै.राम तोलानी यांनाही माननीय प्रा.एन.एम.कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले होते.या दोन्ही सन्माननीय सदस्यांनी विधान परिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे. या सर्वांना मी माझी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

------

. . . .ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

05-12-2005 (असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही) O-2

श्री.रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी याठिकाणी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, एक काळ असा होता की, ज्या काळात स्वातंत्र्याची लढाई महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली लढली जात होती. त्याच काळामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना माणुसकीचा हक्क मिळवून देण्यासाठी संघर्ष करावा लागत होता. सायमन कमिशनसमोर साक्ष देताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, "आम्ही माणसे आहोत आणि आम्हाला माणसासारखे जगता आले पाहिजे, आम्हाला माणसासारखे वागविले पाहिजे. त्याचवेळेला राऊंड टेबल कॉन्फरन्स्मध्ये ते असे बोलले आणि स्वतंत्र मतदार संघ मिळवून घेतला. महात्मा गांधी यांनी उपोषण केले आणि महात्मा गांधी म्हणाले की, डॉ.आंबेडकर, दलितों को हिंदू समाज से तोडो मत." या काळात कै.के.आर.नारायणनसाहेब हे विद्यार्थी होते आणि ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी यांच्या चळवळी पहात होते, त्यांची भाषणे ऐकत होते आणि "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा "हा जो मंत्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला, तो मंत्र त्यांनी आपल्या ह्दयात रुजवून ठेवला होता. एवढेच नव्हेतर स्वातंत्र्याची लढाई लढता-लढताच त्यांनी हरिजनाचा उद्धार झाला पाहिजे म्हणून गुजराथमध्ये काशा या हरिजनाच्या उद्धारासाठी प्रयत्न केले. त्यावेळेला त्यांच्यावर बहिष्कार देखील टाकण्यात आला होता. त्या काळामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्या विचारसरणीच्या या देशात जर राजकारण करावयाचे असेल तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर असे म्हणाले होते की, शासनकर्ते जमात होणे हा आमचा जन्मसिध्द हक्क आहे. त्या पार्श्वभूमीवर कै.के.आर.नारायणनसाहेबांनी अभ्यास केला, डॉक्टर झाले, विद्वान झाले, राजकारणात आले आणि उप राष्ट्रपती झाले. ज्यावेळेला राष्ट्रपती पदाची निवडणूक होती, तेव्हा देशामध्ये वादळ माजले. महात्मा गांधी असे म्हणाले होते की, या देशाच्या सर्वोच्य पदावर हरिजन समाजाचा, दलित समाजाचा, मागासवर्गीय समाजाचा माणूस गेला पाहिजे.त्यावेळी मला समाधान वाटेल. राष्ट्रपती पदाच्या निवडणूकीच्यावेळी निर्णय घेण्यात आला आणि कै. के. आर. नारायणनसाहेबांना राष्ट्रपती करण्यात आले.त्यावेळेला दलित समाज, मागासवर्गीय समाज फार खुष झाला होता की, महात्मा गांधी यांचे स्वप्न पूर्ण झाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जे सांगितले होते की, शासनकर्ते जमात बनणे हा आमचा जन्मसिध्द हक्क आहे या मंत्राचा उपयोग

. . . .ओ-3



APR/RJW 14.10

असुधारीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

झाला आणि कै.के.आर.नारायणनसाहेब या देशाचे राष्ट्रपती झाले म्हणून दलितांना फार आनंद झाला. त्यावेळेला माणुसकीची खरी ओळख झाली. पण 9 नोव्हेंबर 2005 रोजी त्यांचे दु:खद निधन झाले. त्यामुळे देशाची फार मोठी हानी झाली. एक विद्वान माणूस आपल्यातून निघून गेला. ज्याच्याजवळ शालीनतेचा शालू, कष्टाचा देव्हारा होता आणि पावित्र्याची गंगा त्यांनी आपल्या जीवनात निर्माण केली होती असा महापुरुष आपल्यातून निघून गेला. तसेच कै.प्रा.मधु दंडवतेजी हे देखील स्वातंत्र्याच्या लढाईमध्ये होते, त्यांचेही दु:खद निधन झाले आहे. त्याचबरोबर या विधान परिषदेचे सन्माननीय सदस्य सर्वश्री.रतनलाल मोहनलाल, राम आसुदोमल तोलानी यांचेही दु:खद निधन झाले आहे,मी त्यांनाही आदरांजली, श्रध्दांजली अर्पण करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद.

-----

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सदनाचे नेते, उप मुख्यमंत्री माननीय आर.आर.पाटील यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती आदरणीय के.आर.नारायणन् दलित कुटुंबामध्ये जन्माला आले. स्वकर्तृत्वावर पत्रकार, प्राध्यापक, राजदूत, खासदार, मंत्री, उप राष्ट्रपती आणि राष्ट्रपती या पदापर्यन्त ते पोहोचले. या देशाचे राष्ट्रपती दलित व्हावेत, हे गांधीजींचे स्वप्न त्यांच्या रुपाने साकारले. के.आर.नारायणन् हे केवळ नामधारी राष्ट्रपती नव्हते. त्यांनी गुजरातमध्ये घडलेल्या घडामोडीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारला आपल्या कर्तृत्वाची जाणीव करुन दिली. कर्तव्यनिष्ठा आणि स्वकष्टातून देशाच्या सर्वोच्च पदापर्यन्त पोहोचलेल्या या महान व्यक्तीमत्वाला मी आदरांजली अर्पण करतो. या सदनाचे माजी सदस्य श्री.रतनलाल मोहनलाल आणि श्री.राम तोलानी याही सदस्याच्या निधनाबद्दल मी शोक व्यक्त करतो.

यानंतर या सदनाचे अल्पकाळ सदस्य असलेले समाजवादी नेते, आदरणीय मधु दंडवते यांच्याविषयी अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ते माझ्या पक्षाचे नेते होते. त्यांच्याविषयी व्यक्तीगत माझ्या जीवनामध्ये ज्या अनेक घडामोडी घडल्या आणि माझ्या राजकीय वाटचालीमध्ये त्यांनी मार्गदर्शन करुन योगदान दिले, त्यामुळे मी आज या ठिकाणी उभा राहू शकलो. थोर समाजवादी विचारवंत श्री.अच्युतराव पटवर्धन, जयप्रकाश नारायण, एस.एम.जोशी, युसुफ मेहेर अली यांच्या विचाराने प्रभावित होऊन प्रा. मधु दंडवते समाजवादी चळवळीमध्ये सहभागी झाले. समाजवादी विचारावरील निष्ठा ही केवळ व्यासपीठावरुनच नव्हे तर प्रत्यक्ष जीवनामध्ये त्यांनी आचरणात आणली. स्वातंत्र्य लढ्यामध्ये, गोवामुक्ती आंदोलनामध्ये, संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये, आणीबाणीच्या विरोधामध्ये त्यांनी लढा दिला, तुरुंगवास सोसला आणि पोलिसांच्या लाठ्याही खाल्ल्या. गोवामुक्ती आंदोलनाचा उल्लेख झाला. त्यावेळी गेलेल्या पहिल्या तुकडीवर पोर्तुगालच्या सैन्यांनी गोळीबार केला, त्यामध्ये सहा हुतात्म्ये झाले. त्यावेळेस मोरारजीभाई देसाई मुख्यमंत्री होते. गोव्यामध्ये सत्याग्रहींना घेऊन जाणाऱ्या गाडया जाऊ नयेत, अशाप्रकारचा आदेश मुख्यमंत्र्यांनी त्यावेळेला दिला होता. दुसऱ्या तुकडीचे नेतृत्व प्रा.मधु दंडवते करत होते. गोव्याच्या सरहद्दीपर्यन्त वाहनाने जाता येणार नाही, त्यामुळे दुसरी तुकडी पाठवू नये असा विचार गोवा मुक्ती आंदोलनाच्या नेत्यांनी केला. पण मधु दंडवते ठामपणे सांगितले की, ही तुकडी सत्याग्रहींना

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

एसकेके/

प्रा.शरद पाटील (पुढे चालू....

पायी घेऊन जाईल. त्याप्रमाणे गोव्याच्या हद्दीपर्यन्त यांची तुकडी गेली. गोव्यामध्ये प्रवेश करण्यासाठी मधु दंडवते आणि त्यांचे सहकारी सामोरे गेले, त्यावेळेला सुदैवाने पोर्तुगालच्या सैन्यांनी गोळीबार केला नाही, परंतु......

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कु. थोरात/श्री.वाणी... प्रथम श्री.किल्लेदार.... 2.20

प्रा. शदर पाटील...

त्यांच्यावर लाठीमार एवढा प्रचंड केला की, त्या लाठीमारामुळे प्रा. मधू दंडवते जबर जखमी झाले. त्यांना इस्पितळामध्ये अनेक दिवस ठेवावे लागले. त्या लाठीमाराच्या जखमा शेवटपर्यंत त्यांच्या शरीरावर होत्या. त्यांचे शरीर खिळखिळे करुन टाकले होते. आणीबाणीमध्ये 19 महिने त्यांनी तुरुंगात काढले. कोकण रेल्वेसंबंधीच्या त्यांच्या योगदानाबद्दल इतर अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगितलेले आहे. त्याशिवाय मी आणखी काही गोष्टींचा उल्लेख या ठिकाणी करु इच्छितो. आणीबाणीनंतर जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले. प्रा. मधू दंडवते त्यावेळी रेल्वे मंत्री झाले. कोकण रेल्वेचे स्वप्न ते त्यावेळी साकार करु शकले नाहीत पण तेथूनच ख-या अर्थाने कोकण रेल्वेच्या उभारणीला सुरुवात झाली. रेल्वेमंत्री झाल्यानंतर त्यांनी पहिल्यांदा निर्णय घेतला की, आणीबाणीच्यावेळी ज्या 50,000 कर्मचा-यांना नोकरीतून काढून टाकले होते त्यांना पुन्हा कोणत्याही अटीशिवाय नोकरीत घ्यावयाचे. प्रा. मधू दंडवते यांनी अर्थमंत्रीपदाच्या कारकीर्दीमध्ये देशात पहिल्यांदा शेतक-यांचे कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना चळवळीमध्ये काम करण्यास प्रोत्साहन दिले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा देशाच्या सर्वोच्च संसदेच्या सभागृहामध्ये फोटो लावण्याचा निर्णय प्रा. मधू दंडवते यांच्यामुळे झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना "भारतरत्न" ही पदवी केंद्र सरकारने बहाल केली त्यामध्ये प्रा. मधू दंडवते साहेबांचा मोठा सहभाग होता.प्रा. मधू दंडवते आजारी असतांना शेवटी त्यांना भेटण्यासाठी आम्ही गेलो होतो. प्रा. मधू दंडवते आयुष्यभर जसे जगले तसेच ते मृत्यूला सामोरे गेले. ज्या ध्यैर्याने आणि निर्धाराने पोर्तुगीज पोलिसांच्या लाठया त्यांनी खाल्या त्याच ध्यैर्याने त्यांनी मृत्यूला तोंड दिले. मी आणि श्री. व्यंकप्पा पत्की त्यांना भेटायला गेलो होतो. त्यावेळी नाना असे म्हणाले की, I know what is happening. I am a freedom fighter. जसा मी पोर्तुगीजांशी लढलो तसाच मी मृत्यूशी लढत आहे. त्यावेळी त्यांनी मला विचारले की, सांगलीला पुरामुळे फार नुकसान झालेले आहे. तेथील सगळया लोकांना मदत मिळाली आहे काय? मृत्यूशय्येवर असतांना शेवटच्या क्षणी देखील गोरगरीब माणसाचा विचार त्यांनी सोडला नाही. जीवंत असे पर्यंत त्या जीवनाचा आनंद देखील त्यांनी शेवटपर्यंत घेतला. ज्या दिवशी आम्ही त्यांना भेटायला गेलो होतो, त्यादिवशी भारत-श्रीलंका वन-डे मॅच सुरु होती. त्यावेळी प्रा. मधू दंडवते असे म्हणाले की, ढोणीने सिक्सर मारला पाहिजे. आणि त्यावेळी ढोणीने खरोखरच सिक्सर मारला. असे हे आमचे नेते आज आपल्यात नाहीत. त्यांना मी आदरांजली अर्पण करुन माझे विचार संपवितो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ): सभापती महोदय, या सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री यांनी भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती कै. के.आर. नारायणन, या सभागृहाचे माजी सदस्य सर्वश्री रतनलाल मोहनलाल, राम आसुदोमल तोलानी व प्रा. मधु रामचंद्र दंडवते यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्याला मी पाठिंबा देतो. या सर्व नेत्यांच्या दु:खद निधनाबद्दल सभागृहामध्ये सदस्यांनी विविध विचार या ठिकाणी मांडलेले आहेत. मी फक्त एकाच गोष्टीचा उल्लेख करुन माझे विचार संपविणार आहे. प्रा. मधु दंडवते यांनी रेल्वे मंत्री असतांना कोकण रेल्वे रोहयापर्यंत आणली.

यानंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ RJW/DD पूर्वी कु. थोरात 14:25

श्री. जयंत प्र. पाटील ......

पण रोहयापासून सावंतवाडीपर्यंत पुढे रेल्वे नेण्याची कामगिरी प्रा. मधू दंडवते यांनी अर्थमंत्री म्हणून केली. महोदय, ते ज्यावेळी देशाचे अर्थमंत्री होते त्यावेळी बजेटमध्ये कोंकण रेल्वेसाठी एवढी मोठी तरतूद करता येणार नाही असे सांगण्यात आले होते म्हणून त्यांनी त्यावेळी अर्थमंत्री म्हणून रेल्वेचे कार्पोरेशन करण्याचा निर्णय घेतला आणि त्या कार्पोरेशनला पेसे कोण देणार असा मुद्दा ज्यावेळी कॅबिनेटमध्ये विचारण्यात आला त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, मी स्वत: कोंकणात पहिल्यांदा जाऊन या रेल्वेसाठी पैसा गोळा करीन. त्यावेळी ते अर्थमंत्री म्हणून कोंकणात आले, आमच्या रायगड जिल्हयात पहिल्यांदा आले त्यावेळी बेस्ट कामगार युनियनच्या बँकेने 200 कोटी रुपये रेल्वेसाठी दिले. देशाचा अर्थमंत्री गांवोगांव फिरतो ते चित्र आम्ही आमच्या डोळयांनी पाहिलेले आहे. तसेच एक बँकेचा संचालक म्हणून आमच्या बँकेत आले असतांना आम्ही त्यांचे स्वागत केले. त्यावेळी आम्ही देखील आमच्या बँकेच्या वतीने कोंकण रेल्वेसाठी 7 कोटी रुपये दिले होते. त्यावेळी टीका देखील झाली होती की, या रकमेचे रिपेमेंट होऊ शकणार नाही. त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, रेल्वेमंत्री म्हणून मी याबाबत तरतूद केलेली आहे आणि या पैशाचे रिपेमेंट नक्की होईल. अशा प्रकारे मुदतपूर्व या सरकारी कार्पोरेशनमार्फत कोंकण रेल्वेसाठी दिलेल्या पैशाचे रिपेमेंट झाले, असे देशातील पहिलेच सरकारी कार्पोरेशन आहे. त्यांनी अर्थमंत्री म्हणून तरतूद केली होती व मूदतपूर्व तीन वर्षे अगोदरच आमच्या बँकेचे पैसे परत मिळाले. प्रा. मधू दंडवते रेल्वेमंत्री झाले म्हणूनच कोंकणात रेल्वे झाली नाही तर व्ही.पी. सिंगांच्या मंत्रिमंडळात ते अर्थमंत्री झाले नसते तर कोंकण रेल्वे कदापिही झाली नसती आणि आज ही व्हायोबल रेल्वे त्यांच्या नियोजनाप्रमाणे झालेली आहे. मा. महसूल मंत्री श्री. नारायणराव राणे यांनी या ठिकाणी प्रा. मधू दंडवते यांनी केलेली बरीच भाषणे ऐकल्याचे त्यांनी सांगितले, त्याप्रमाणे मी देखील बजेट सादर झाल्यानंतर त्यांची अनेक अर्थपूर्ण व अभ्यासपूर्ण अशी भाषणे मी ऐकली आहेत. त्या भाषणात गरीबांना कसा न्याय मिळतो अथवा मिळत नाही हे मांडण्याचा विचार त्यातून आम्हाला मिळाला आहे. त्यासंदर्भात बोलण्यासाठी मला वेळ अपूरा आहे म्हणून मी मांडू शकणार नाही. त्याचबरोबर माजी राष्ट्रपती के.आर.नारायणन् यांच्याबद्दल बऱ्याच सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेतच, त्यांच्याशी मी सहमत आहे. त्यानंतर सर्वश्री रतनलाल मोहनलाल, राम आसुदोमल तोलानी या नेत्यांच्या दु:खद निधनाबद्दल मी माझ्या पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो व माझे दोन शब्द संपवितो.

----------------

05-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) R-2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंत डावखरे (उप सभापती) : माजी राष्ट्रपती कै. के.आर.नारायणन्, सर्वश्री रतनलाल मोहनलाल, राम आसुदोमल तोलानी तसेच प्रा. मधू दंडवते या सर्व थोर नेत्यांच्या दु:खद निधनाबद्दल सभागृहाचे नेते व मा. उप मुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्यावर सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केला, त्या सर्व भावनांशी मी स्वत: सहमत आहे. या चारही थोर दिवंगत नेत्यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----------------

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माजी राष्ट्रपती स्व. के.आर.नारायणन्, सर्वश्री रतनलाल मोहनलाल, राम आसुदोमल तोलानी तसेच प्रा. मधू दंडवते माजी विधानपरिषद सदस्य यांच्या दु:खद निधनाबद्दल सभागृहाचे नेते आणि मा. उप मुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावाला मा. विरोधी पक्षनेते तसेच गटनेत्यांनी पाठिंबा दिला त्या प्रस्तावावर माझे विचार मी मांडत आहे.

स्व. के.आर.नारायणन्, माजी राष्ट्रपती हे जागतिक किर्तीचे आणि देशातील खऱ्या अर्थाचे एक व्यक्तिमत्व, अनेक अडचणींवर मात करुन शैक्षणिकदृष्टया ज्या परिस्थितीतून ते गेले.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

त्या परिस्थितीत सुध्दा ज्या पध्दतीने महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांनी या देशामध्ये जी जडणघडण केली त्यामुळेच एवढया मोठया कुशाग्र बुध्दिचा नेता निर्माण होऊ शकला. अनेक अडचणीवर त्यांनी मात केलेली आहे त्यामुळेच ख-या अर्थाने आपल्या कुशल कर्तृत्वाने जगातील एक प्रखर व्यक्तिमत्व तयार होऊ शकते हे राष्ट्रपती के.आर.नारायण यांनी दाखवून दिलेले आहे. त्यांनी शैक्षणिक जीवनात अनेक अडथळयावर मात केली होती. घरची परिस्थिती बिकट असतांनाही त्यांचे एम.ए. व लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथून बी.एससी. पर्यंत शिक्षण झाले होते. त्या दरम्यानच्या काळात हिंदू व टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रातून त्यांनी पत्रकारिता देखील केलेली होती. त्यानंतरच्या काळामध्ये अमेरिका, चीन आणि अन्य देशाचे राजदूत म्हणून त्यांना काम करण्याची संधी प्राप्त झाली होती. केंद्रीय मंत्री म्हणून सुध्दा त्यांना काम करण्याची संधी प्राप्त झाली होती. नंतरच्या काळात ते उपराष्ट्रपती सुध्दा झाले. मधाशी अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केल्या प्रमाणे या देशाच्या सर्वोच्च पदावर म्हणजे राष्ट्रपती पदावर त्यांची बिनविरोध निवड झाली होती. ख-या अर्थाने महात्मा गांधीचे स्वप्न हे महात्मा गांधींच्या निधनानंतरच साकार होऊ शकले. या देशातील जनतेने महात्मा गांधीचे स्वप्न पूर्ण केले असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. अशा पध्दतीचे एक राष्ट्रीय व्यक्तिमत्व आपल्यातून निघून गेलेले आहे.

तसेच कै. राम आसुदोमल तोलानी यांनी या सभागृहाचे सदस्य म्हणून काम केलेले आहे. ते जेव्हा या सदनाचे सदस्य होते तेव्हाच त्यांचा आणि माझा परिचय झाला होता. कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस म्हणून, एक कार्यकर्ता म्हणून त्यांनी सर्वसामान्य समाजाच्या अनेक अडचणी सोडविण्याकरिता सातत्यांनी प्रयत्न केला होता. एक अत्यंत कुशाग्र बुध्दिचा काम करणारा नेता म्हणून त्यांचे कार्य मला जवळून पाहता आले.

कै. रतनलाल मोहनलाल यांची आणि माझी भेट कधीही झाली नाही. परंतु त्यांनी सुध्दा या सदनामध्ये दोन वेळा सदस्य म्हणून काम केलेले आहे.

विशेषत: महाराष्ट्राचे सुपुत्र म्हणून प्रा. मधु दंडवते यांनी स्वातंत्र्य लढयामध्ये, गोवा मुक्ती आंदोलनामध्ये तसेच सर्वसामान्यांसाठी जे जे लढे झाले त्यामध्ये त्यांनी नेतृत्व केले होते.

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.....

त्यांनी आपली कुशाग्र बुध्दी असंधटीत समाजाकरिता वापरली होती. संसदीय लढयामध्ये आदर्श कसे पाळावेत, संसदीय लोकशाहीमध्ये अनेक आयुधांचा वापर करुन त्या आयुधाच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसांचे प्रश्न कसे सोडवावेत याचे उदाहरण म्हणजे प्रा. मधु दंडवते हे होय. सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी सांगितल्या प्रमाणे त्यांनी आपल्या कार्यकाळात जे काही महत्वाचे निर्णय घेतले त्यातील 3 महत्वाचे निर्णय या ठिकाणी सांगितले आहेत. 50 हजार रेल्वे कर्मचा-यांना सेवेची संधी पुन्हा मिळवून देण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता तसेच शेतक-यांचा कर्जाचा बोजा माफ करण्याच्या दृष्टीने सुध्दा त्यांनी एक क्रातिकारक निर्णय घेतला होता.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**....

असंघटित शेतकरी कर्जाच्या बोजाखाली सातत्याने दडपला जात होता. त्या परिस्थितीमध्ये मार्ग काढण्यासाठी त्यांनी स्वत:च्या काळात जे क्रांतिकारक निर्णय घेतले, त्याचाही येथे उल्लेख करणे आवश्यक आहे. कदाचित उद्यासुध्दा अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. असंघटित माणसांना मदत करण्यासाठी पुन्हा एकदा प्रा.मधु दंडवते यांची आठवण आल्याशिवाय राहणार नाही. दुर्दैवाने आज राज्य आर्थिक बोजामध्ये सापडले असताना असंघटित शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी निर्णय घेऊ शकलो तरच ती स्वर्गीय प्रा.मधु दंडवते यांना खऱ्या अर्थाने श्रध्दांजली वाहण्यासारखे होईल असे मला वाटते. सदनाच्या समोर जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्याप्रती सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.
शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

श्री.आर.आर.पाटील (उप मुख्यमंत्री) : महोदय, कै.के.आर.नारायणन यांच्याबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी सभागृहाचे आजचे कामकाज तहकूब करावे अशी सूचना मी मांडतो.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

**सभापती** : कै.के.आर.नारायणन, माजी राष्ट्रपती यांच्याबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी सभागृहाचे आजचे कामकाज स्थगित ठेवावे अशी सूचना माननीय उप मुख्यमंत्र्यांनी केली आहे आणि त्या सूचनेला माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अनुमोदन दिले आहे. मला ही सूचना मान्य आहे. आजचे कामकाज तहकूब करण्यापूर्वी मी एक घोषणा करू इच्छितो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: राष्ट्रकूल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या अभ्यासवर्गासंबंधीची घोषणा.

**सभापती** : आपणा सर्वांना विदित आहेच की, राष्ट्रकूल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे दरवर्षी नागपूर येथील अधिवेशन कालावधीत राज्यातील विद्यापीठांतील 'राज्यशास्त्र' व 'लोकप्रशासन' या विषयांचा अभ्यास करणाऱ्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी एका संसदीय अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार यावर्षीसुध्दा मंगळवार, दिनांक 6 डिसेंबर 2005 ते मंगळवार, दिनांक 13 डिसेंबर 2005 या कालावधीत 36 व्या संसदीय अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

सदर अभ्यासवर्गाचे उद्घाटन मा.मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते मंगळवार, दिनांक 6 डिसेंबर 2005 रोजी, सकाळी 9.00 वाजता, विधान परिषद सभागृह, विधान भवन येथे होणार आहे. यासंबंधीची निमंत्रण पत्रिका व अभ्यासगर्वाची कार्यक्रमपत्रिका सर्व सदस्यांना टपाल खणाद्वारे वितरीत करण्यात आली आहे. तरी सर्व माननीय सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी उद्घाटन सोहळयास तसेच संसदीय अभ्यासवर्गास उपस्थित राहून व्याख्यानांचा लाभ घ्यावा.

कै.के.आर.नारायणन यांच्याबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी सभागृहाची बैठक स्थगित होऊन व मंगळवार, दिनांक 6 डिसेंबर 2005 रोजी, दुपारी 12.00 वाजता पुन: भरले.

(सभागृहाची बैठक 2 वाजून 38 मिनिटांनी मंगळवार, दिनांक 6 डिसेंबर 2005 रोजीच्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही